■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक २५ ● मंगळवार, दि. ११ ते १८ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

## महत्वाचे

### १५ नोव्हेंबरपासून मुग, उडिद व सोयाबीन खरेदीला प्रारंभ होणार

वाशिम, दि. ४ नोव्हेंबर (जिमाका) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, आणि नाफेड कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार मुग, उडिद व सोयाबीन खरेदी योजना राबविण्यात येत आहे.

■ शेतकरी बांधवांनो.... नाफेडची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली बरं का.!

■ आधारभूत दर निश्चित; योग्य भाव मिळविण्याची संधी

या योजनेअंतर्गत शेतकरी नोंदणी प्रक्रिया ३० ऑक्टोबर २०२५ पासून, तर खरेदी प्रक्रिया १५ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होणार आहे. केंद्र शासनाने मुग ८ हजार ७६८ रुपये प्रति क्विंटल,उडिद ७ हजार ८०० रूपये प्रति क्विंटल, सोयाबीन ५ हजार ३२८ रूपये प्रमाणे प्रति क्विंटल आधारभूत दर निश्चित केले आहेत. राज्य शासनाने वाशिम जिल्ह्यासाठी नाफेड ही केंद्रिय नोडल एजन्सी नियुक्ती करून दिली आहे. शेतकऱ्यांनी आपल्या गावाजवळील नाफेडच्या (नॅशनल ॲग्रिकल्चरल कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया लिमिटेड) नजिकच्या खरेदी केंद्रावर जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी करताना आधारकार्ड,बँक पासबुक,चालू वर्षाचा ७/१२ उतारा,पीकपेरा इत्यादी आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. ऑनलाईन नोंदणी पीओएस मशिनद्वारे केली जाणार असून शेतकऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर खरेदीसाठी एसएमएस प्राप्त झाल्यावर शेतमाल विक्रीसाठी केंद्रावर आणावा. या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देणे हा आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, उपाध्यक्ष रोहित निकम, व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे-पाटील तसेच संचालक मंडळाने केले आहे.

### स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी प्रमुख प्रचारकांची संख्या दुप्पट : आता ४०!

वाशिम, दि. ८ नोव्हेंबर (जिमाका) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांच्या संख्येत वाढ करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने ही मर्यादा २० वरून ४० इतकी केली आहे. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी प्रमुख प्रचारकांची संख्या वाढविण्याची मागणी केली होती.

या मागणीचा विचार करून आयोगाने निर्णय घेतला आहे. 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' मधील परिच्छेद २६ मध्ये प्रमुख प्रचारकांसंदर्भातील नियम नमूद आहेत. त्याअन्वये, राजकीय पक्षांना प्रमुख प्रचारकांची यादी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावी लागणार आहे.

■ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी घेतला आढावा

# मतपत्रिका, पोस्टल मतपत्रिका व मनुष्यबळ व्यवस्थापनावर सविस्तर सादरीकरण

**वाशिम, दि. ६ नोव्हेंबर (जिमाका) - नगरपालिका, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीसंबंधीच्या तयारीचा सखोल आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आज दि. ६ नोव्हेंबर रोजी बैठक पार पडली. या बैठकीत मतपत्रिका (बॅलेट पेपर), पोस्टल मतपत्रिका (पोस्टल बॅलेट) तसेच मनुष्यबळ व्यवस्थापन या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर सादरीकरण करण्यात आले.**



या बैठकीस अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, नगरपालिका प्रशासन सहआयुक्त बी.डी. बिक्कड, जिल्हा खनिकर्म अधिकारी विनय राठोड, नगरपालिका प्रशासन सहाय्यक आयुक्त परदेशी, शिक्षणाधिकारी संजय ससाणे, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव आदी जिल्हास्तरीय नोडल अधिकारी उपस्थित होते. सादरीकरण श्री. पुंडे व श्री. परदेशी यांनी केले. या सादरीकरणामध्ये मतपत्रिकांच्या छपाई, वितरण, सुरक्षित साठवणूक, तसेच पोस्टल मतपत्रिकांच्या वितरण व प्राप्ती प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. मतदानाच्या दिवशी सर्व मतपत्रिका वेळेत उपलब्ध व्हाव्यात, वाहतूक व सुरक्षा व्यवस्था चोख राहावी यासाठी आवश्यक नियोजन सादर करण्यात आले. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना नियोजनबद्ध कामकाज, अचूकता आणि पारदर्शकता राखण्याच्या सूचना दिल्या. पोस्टल मतपत्रिकांच्या संदर्भात वेळेत अर्ज स्वीकृती, वितरण आणि सुरक्षित साठवणुकीबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

मनुष्यबळ व्यवस्थापनासंबंधी मतदान केंद्रांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, कार्यविभाजन, जबाबदाऱ्या तसेच समन्वय यावरही चर्चा झाली. प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने काम करावे, मतदारांना सुकर, सुरक्षित व पारदर्शक मतदानाचा अनुभव मिळावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी सांगितले की, रॅन्डमायजेशन प्रक्रियेमुळे मतदान केंद्रांवर नेमले जाणारे अधिकारी आणि कर्मचारी हे पूर्णपणे संगणकीय पद्धतीने ठरवले जात असल्याने निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता सुनिश्चित होते. फ


त्यांनी या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना विशेष दक्षता घेण्याचे निर्देश दिले.सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व मुख्याधिकारी दुरदृष्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.

# वाशिममध्ये ११ नोव्हेंबर रोजी 'सरदार१५० युनिटी मार्च पदयात्रा'

■ एकतेचा जयघोष ,राष्ट्रीय अभिमान, एकता आणि स्वावलंबनाचा संदेश

■ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे माय भारत केंद्राचे आवाहन

**वाशिम,दि.८ नोव्हेंबर (जिमाका) - युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार आणि माय भारत वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने सरदार१५० युनिटी मार्च आणि विकसित भारत पदयात्रा या उपक्रमाचे आयोजन ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते १० यावेळेत वाशिम येथे करण्यात आले आहे.**




सरदार वल्लभभाई पटेल यांच्या एकसंध भारताच्या विचारांना स्मरून एकात्म भारताच्या निर्मितीचा संकल्प या माध्यमातून घेतला जाणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश तरुणांमध्ये राष्ट्रीय अभिमान, सामाजिक जबाबदारी आणि एकतेची भावना निर्माण करणे असा असून, सर्व नागरिकांनी या ऐतिहासिक पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन माय भारत केंद्राचे लेखा अधिकारी अनिल ढेंगे यांनी केले आहे.या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहाण, नगरपरिषद मुख्याधिकारी निलेश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू, जिल्हा युवा अधिकारी सारंग मेश्राम, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक अशोक वाघ, माय भारत केंद्र लेखा अधिकारी अनिल ढेंगे, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप लांजेवार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या पदयात्रेद्वारे तरुणांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण राष्ट्राच्या ऐक्य, अखंडता आणि देशभक्तीच्या भावनांना पुनरुज्जीवित करतील.

देशव्यापी मोहिमेची पार्श्वभूमी : ६ ऑक्टोबर २०२५ रोजी भारत सरकारने माय भारत पोर्टल वरून 'सरदार१५० युनिटी मार्च' या डिजिटल मोहिमेची सुरुवात केली. या उपक्रमात सोशल मीडिया रील स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा आणि सरदार१५० यंग लीडर्स प्रोग्राम चा समावेश आहे. या प्रोग्राममधील १५० विजेत्यांना राष्ट्रीय पदयात्रेत सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे.

मोहिमेचे दोन टप्पे : १.प्रत्येक जिल्ह्यात ८ ते १० कि.मी. लांबीची पदयात्रा काढली जाईल.

शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, वादविवाद, परिसंवाद, पथनाट्य आदी उपक्रम,'ड्रग्जमुक्त भारत' व 'अभिमानाने स्वदेशी' अशा प्रतिज्ञा अभियानासह योग, आरोग्य व स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात येणार आहे.पदयात्रेदरम्यान सरदार पटेल यांच्या प्रतिमेस अभिवादन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रमाणपत्र वितरण केले जाईल. पदयात्रेचे नेतृत्व एनसीसी अधिकारी करतील.

२. राष्ट्रीय पदयात्रा (२६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२५) करमसद (पटेल यांचे जन्मस्थान) ते केवडिया (स्टॅच्यू ऑफ युनिटी) असा १५२ कि.मी. प्रवास होईल. मार्गावरील गावांमध्ये सामाजिक विकास उपक्रम, 'डेव्हलपिंग इंडिया प्रदर्शन' आणि 'सरदार गाथा' सादर केली जाईल.

नोंदणी आणि सहभाग :

सर्व नोंदणी माय भारत पोर्टल https://mybharat.gov.in/pages/unity-dmarch यावर सुरू आहेत. जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून एक भारत, श्रेष्ठ भारत या संकल्पनेला प्रत्यक्षात आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


# ग्रंथ हेच गुरू

अलीकडे वाचनाची आवड कमी होऊ लागली आहे असे अनेकजण म्हणतात, ते थोडेफार खरे असले तरी दूरदर्शनमुळे वाचण्याऐवजी ऐकण्यात आणि पाहण्यातच अनेकांचे मन गुरफटून जाते. असे असले तरी केवळ प्रेक्षक वा श्रोता होण्याने सर्वांच्या मनाची भूक भागत नाही. एकदा लहानपणी पुस्तकांशी मैत्री झाली की, ती संगत कधी सुटत नाही. जीवनातले अनुभव अधिक डोळसपणे देण्याची शक्ती पुस्तक आपल्याला देतात.

आपलं व्यक्तिमत्त्व अधिक सुजाण संपन्न करतात. 'वाचनालयाविना शाळा म्हणजे शस्त्रागाराविना किल्ला होय' पूर्वीच्या काळी देशाभिमानाने प्रेरित होऊन समाज शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्थापन केलेली ही ग्रंथालये म्हणजे स्वातंत्र्यप्रेमाची व जागृतीची प्रतीकेच आहेत. 'पुस्तक वाचल्यावर मस्तक तयार होतं आणि मस्तक तयार झाल्यावर माणूस कुठेही नतमस्तक होत नाही,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे. आज विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक तथा समाजातील सर्वच घटकांचे वाचन कमी होत आहे हे वास्तव आपल्याला नाकारता येणार नाही. वाचनाद्वारे व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक गोष्टी सहाय्यभूत ठरतात. हे जवळपास प्रत्येक यशस्वी क्षेत्रातील तज्ज्ञ तथा अनुभवी व्यक्तींचे मत आहे. आज विद्यार्थी वर्ग केवळ मिळेल त्या साधनांद्वारे फक्त माहिती गोळा करीत आहे. अभ्यासक्रमाशी पूरक असणाऱ्या उपयुक्त वाचनाकडे अनेकांचा कल आहे; परंतु मूळ कलाकृतीचा अभ्यास करण्याकडे, वाचन वाढवण्याकडे अनेकांचे दुर्लक्ष होत आहे. देशाला महासत्ता बनवण्याचे ज्यांनी प्रथम स्वप्न पाहिले ते आपले राष्ट्रपती भारतरत्न भारताचे मिसाईल मॅन डॉक्टर ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या राष्ट्रीय कार्याची दखल म्हणून त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिनाच्या रूपात आज सर्वत्र सर्व शाळांमध्ये साजरा करण्यात येतो; परंतु हा एक दिवसाचा कार्यक्रम न राहता त्यात सातत्य राहणे गरजेचे आहे.

'वाचाल तर वाचाल, ग्रंथ हेच गुरू, पुस्तक मस्तक घडवतात, प्रसंगी अखंडित वाचीत जावे अशी अनेक वाक्य कानावर येतात. पण कोण लक्षात घेतो? मोबाइल, इंटरनेटच्या जमान्यात वाचन दुर्लक्षित झाले का? अन् असेल तर तो खजिना आजच्या विद्यार्थ्यांना कसा उपलब्ध करून देता येईल. आज जे काही विद्यार्थ्यांकडून वाचले जाते ते केवळ पाठ्यपुस्तकांमधीलच. शिक्षक आपले अभ्यासक्रमामध्ये, तर विद्यार्थी त्यांच्या परीक्षेच्या अभ्यासात गुंग, कुणालाच दोष देता येणार नाही. पण जेवण जसे चौरस असावं तसं वाचन देखील चौफेर असावे. सार्वजनिक तसेच महापालिकेची वाचनालये आज ओस पडत असल्याचे दिसते.

ज्येष्ठ नागरिक सोडता तरुणांनी वाचनालयाकडे पाठ फिरवली आहे. हा सोशल मीडियाचा परिणाम आहे. काही ठिकाणी वाचक आहेत पण वाचनालयात दर्जेदार पुस्तके, साहित्य ग्रंथ, उपलब्ध नाहीत. बऱ्याच वेळा भरमसाट पुस्तके



प्रसिद्ध होतात. त्यातील ठरावीक पुस्तकांची विक्री होते मग वाचन कमी झाले अशी ओरड सुरू होते. या ओरडण्याला तसा अर्थ नाही. हा निराशावादी दृष्टिकोन आहे. असे मला वाटते वाचनाचे अनेक पर्याय सध्या आपल्याकडे आलेले आहेत.

पारंपरिक छापील पुस्तकांबरोबर आधुनिक अशा ई-बुक सारख्या पुस्तकांमुळे पुस्तकांचे विश्व अधिकच रुंदावले आहे. किंबहुना यामध्ये रोजच भर पडत आहे. आधुनिक साधनांमुळे कमी जागेत, कमी खर्चात जास्त संख्येने पुस्तकं साठवली जातात. आज ऑनलाईन पुस्तकांच्या माध्यमातून अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. विविध पुस्तकांवर भरपूर सूट, प्रदर्शन व ऑनलाइन विक्रीमध्ये मिळत असल्याने वाचक पुस्तक खरेदी करणे पसंत करत आहेत. सध्या वाचकांच्या घरी स्वतःची छोटी छोटी वाचनालये उदयास येत आहेत, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सध्या वाचन संस्कृतीने आपल्या पारंपरिक ढाचा बदलून नवा ढाचा तयार केला आहे. जोपर्यंत मानवाला ज्ञानलालसा आहे तोपर्यंत वाचन संस्कृती लयास जाणे कदापिही शक्य नाही.

आताचे जग ऑनलाइन वाचनालयाचे आहे. विविध लेखकांचे ब्लॉग, विविध लेख, पेज, ई-पेपर याद्वारे लेखन वाचकांसाठी उपलब्ध होत आहे. विविध ऑनलाईन ॲप्स, पीडीएफ स्वरूपात उपलब्ध पुस्तके मोबाइलवर उपलब्ध आहेत.

यामुळे वाचनालय आपल्या सदैव सोबती अशा परिस्थितीमुळे ग्रामीण व शहरी भागातील वाचनालये सुनी सुनी झाल्याचे आपल्याला पाहायला मिळते. दुसरीकडे मात्र आजही मुंबई-पुणे यांसारख्या शहरात लोकल ट्रेन, एसटी यामध्ये पुस्तके वाचणारी अनेक मंडळी आपल्याला निदर्शनास पडतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त एसटी बसमध्ये वाचनालयाची संकल्पना सध्या पाहायला मिळते. त्याशिवाय पुस्तकांचे गाव भिलार ही याची आदर्श उदाहरणे सांगण्यात येतील.

## बगडिया महाविद्यालयात 'वंदे मातरम'चे सामूहिक गायन

रिसोडः भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम' या गीतास ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्षे पूर्ण होत असल्याने, या ऐतिहासिक सोहळ्यानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार, उत्तमचंद बगडिया महाविद्यालयात आज, ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताचे सामूहिक गायन उत्साहात पार पडले.

देशभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने हे सामूहिक गायन आयोजित करण्यात आले होते. यावेळी भाषणातुन प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी सर यांनी 'वंदे मातरम' या गीताचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले की, हे गीत केवळ शब्द नसून, ते प्रत्येक भारतीयाच्या मनात देशप्रेम आणि बलिदानाची भावना जागृत करणारे एक शक्तिशाली स्फुर्तीगीत आहे. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होणे हे



आपल्या सर्वांसाठी खूप महत्त्वाचे आहे. त्यांनी शासनाच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या उत्साहाबद्दल त्यांचे आभार मानले. हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व उत्साही वातावरणात पार पडला, ज्यामुळे महाविद्यालयातील राष्ट्रीय भावनेला अधिक बळकटी मिळाली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनोद कुलकर्णी, प्रा. डॉ. खेडेकर मॅडम, प्रा. टिकार, प्रा. डॉ. वानखडे, प्रा. डॉ. बुधवंत, प्रा. डॉ. नंदेश्वर, प्रा. डॉ. मेश्राम, प्रा. डॉ. मनोज नरवाडे, प्रा. संदिप जुनघरे, प्रा. राम जुनघरे, प्रा. पांढरे, प्रा. राऊत, प्रा. डॉ. काळे, प्रा. मनवर, प्रा. प्रजापती, प्रा. पाठक , प्रा. साबळे, प्रा. बाजड, प्रा. बोंडे , प्रा. लाव्हरे, प्रा. वाघ, ओकार पुरी, गोपाल कोल्हे, श्री संतोष घुगे, सुरज नरवाडे, श्री सुनिल चराटे, श्री गजू जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी तसेच विद्यार्थ्यांनी एकाच वेळी, एका सूरात 'वंदे मातरम'चे गायन केले. यावेळी वातावरणात देशभक्तीचा आणि राष्ट्रीय अस्मितेचा आगळावेगळा उत्साह संचारला होता. श.प्र.

## उमेदवारांसह सूचक अनुमोदक यांनी भरली ८ लाखाची करपट्टी

### नाहरकत प्रमाणपत्रासाठी मालमत्ता कर भरणे आवश्यक

रिसोडः निवडणुकीत भाग्य आजमावण्यासाठी आवश्यक असलेले नाहरकत प्रमाणपत्र त्यासाठी मालमत्ता कर भरल्याशिवाय मिळत नाही. या पार्श्वभूमीवर स्थानिक नगर परिषदेच्या कर विभागाने ८ नोव्हेंबर रोजी एकाच दिवसात तब्बल २ लाख ३५ हजार ४३३ रूपयांची करवसुली करून इच्छुकांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा केला. नगर परिषदेच्या अध्यक्ष व २३ सदस्यांच्या रिक्तपदांसाठी येत्या २ डिसेंबर रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे.

याअनुषंगाने १० ते १७ नोव्हेंबर या कालावधीत इच्छुक उमेदवारांना निवडणूक आयोगाकडून नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची मुभा देण्यात आली आहे. नामांकन अर्ज दाखल करताना सोबत उमेदवारांना नगरपरिषदेचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करावे लागते आणि उमेदवारांना स्वतःचा तथा सूचक आणि अनुमोदक यांचा मालमत्ता कर पूर्ण भरल्याशिवाय पालिका प्रशासन हे नाहरकत प्रमाणपत्र देत नाही. त्यामुळे ७ नोव्हेंबर रोजी



सुमारे २० पेक्षा अधिक इच्छुक उमेदवारांनी नगर परिषदेच्या कर विभागात जाऊन स्वतःचा आणि आपल्या सूचक व अनुमोदक यांचा सुमारे ८ लाख ३५ हजार ४३३ रुपयांचा कर भरला आहे. इतरवेळी कराची एवढी रक्कम गोळा करण्यासाठी प्रशासनाला १५ दिवसाचा अवधी लागतो. मात्र, निवडणुकीमुळे हे काम एका दिवसात झाले. येत्या काही दिवसात भक्कम कर वसूल होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, मुख्याधिकारी सतीश शेवदा व कर निरीक्षक अब्दुल शाह, अनिल सानप, शिवहार मिसाळ, एन डी चराटे ,सोमनाथ ओवाळकर, अब्दुल जमील आदींनी कर वसुलीसाठी प्रयत्न केले आहे ता.प्र.

## डॉक्टर अल्लामा इक्बाल उर्दू माध्यमिकउच्च माध्यमिक शाळेत डॉक्टर इक्बाल जयंती साजरी



रिसोड : स्थानिक रिसोड आज दिनांक नऊ नोव्हेंबर रोजी शाळेचे अध्यक्ष कबीर मोहसीन साहेब यांचे अध्यक्षतेखाली ज्येष्ठ कवी डॉक्टर इक्बाल यांची शाळेत जयंती साजरी करण्यात आली. डॉक्टर कवी डॉक्टर इक्बाल यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला व संभाव्य भाषेने झाली त्यानंतर ज्युनिअर लेक्चरर मोहम्मद अबुलाला यांनी डॉ यांचे प्रत्येक शेर व शायरी ची कवीतेची गझलची स्थापना कसे प्रकारे करण्यात आली व कवी इकबाल यांचे शायरी चा अर्थ काय यांचा प्रत्येकक्ष लेखाजोखा विद्यार्थी समोर मांडला. आपल्या अध्यक्ष ने भाषणात लाज कबीर मशीन साहेबांनी सांगितले की विद्यार्थ्यांमध्ये असे महान व्यक्तिमत्व चे गुण यावे म्हणून असे प्रोग्राम असे कार्यक्रम साजरे करण्यात येत आहे व आपण यामध्ये सहभागी झाले त्याबद्दल सर्वांचे आभार. प्रमुख पाहुणे म्हणून प्रचार्य जमीर अहमद खान सर व ज्येष्ठ शिक्षक जाकीर मोहम्मद शेख हे होते. संचालन व आभार सईद खान यांनी मांडले . कार्यक्रम यशस्वी करण्यास सर्व शिक्षकांनी व शिक्षक तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

## कोल्हापुरी बंधाऱ्यात गेट टाकण्या संदर्भात कार्यकारी अभियंता यांना निवेदन

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - कार्यकारी अभियंता, लघुपाट बंधारे विभाग वाशिम, यांना दि.०७ नोव्हेबर रोजी पैनगंगा नदीवरील असलेले कोल्हापुरी बंधारे पर्यंत गेट टाकून बंद करण्या करिता निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमुद आपल्या विभागाकडून १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत संबंधित बंधाऱ्यांमध्ये गेट टाकून पाणी अडवणे गरजेचे होते. परंतु अद्याप तरी आसेगावपेण येथील कोल्हापुरी बंधारा अडवण्यात (पाणी) आला नाही. व त्यामध्ये अडकलेले, वाहून आलेली लाकडे व काडीकचरा अ?द्यापही काढण्यात आला नाही. त्यामुळे आपण जाणून बुजून आपल्या कार्यात कुचराई करत आहात व शेतकऱ्यांना वेठीस धरत आहात. असे यावरून लक्षात येते. गेट टाकून तयार



व्हायला पाहिजे होते. त्यामुळे रब्बी हंगामात माझी मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी वारंवार पण केले. पण प्रतिसाद दिला नाही. जर आपण शेतकऱ्यांच्या हिताचे कार्य आठ दिवसाच्या आत पूर्ण केले नाही तर आपल्या कार्यालयामध्ये शेतकरी घेऊन आपल्या कार्यालयामध्ये ठिय्या आंदोलन का करण्यात येऊ नये?, हे कार्य आठ दिवसाच्या आत पूर्ण झाले नाही तर नाईलाजाने भविष्यात आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागेल. असेही निवेदनात शिवसेनेचे तालुकाप्रमुख नारायण आरोप यांनी म्हटले आहे. व होणाऱ्या परिणामाचे घडणारे परिणाम आपले कार्यालयास व आपल्याला भोगावे लागतील व याबाबत आपणच सर्वस्वी जबाबदार असाल भविष्यात होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस आपण स्वतः व आपले कार्यालय जबाबदार असेल याची कोणतीही जबाबदारी भविष्यात आमच्यावर (शेतकऱ्यांवर) नसेल. याबाबतचे निवेदन कार्यवाहीस्तव निवेदन सादर कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग वाशिम यांना निवेदनदेऊन मागणी करण्यात आली आहे.

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# आसरामाता मंदिरात कार्तिक पौर्णिमा

## महाप्रसाद वाटप; आसरा माता ऑटो युनियनचा पुढाकार

धार्मिक

▶ रिसोड, (श. प्र.). तालुक्यातील भर जहागीर येथील भाविकाचे श्रद्धास्थान आसलेल्या तीर्थक्षेत्र आसरामाता मंदिर परिसरातील आसरामाता ऑटो संघटनेच्यावतीने कार्तिक पौर्णिमेनिमित्त शुक्रवारी (दि. ७) भाकरी अन मिश्र डाळ या महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

भगवान पुरी महाराज यांच्याहस्ते पुजनानंतर आसरामाता जंगदबा देवीची आरती व नैवैदय अर्पण केल्यानंतर महाप्रसादाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी आ. अमित झनक, जि. प. सदस्य अमित खडसे, विधान परिषदेच्या आ. भावना गवळी, तालुका प्रमुख मछिंद्र ढोने,



माजी खा. अनंतराव देशमुख, रवी आढाव, अशोक सोगे, अनिल गरकळ, नाथा पाटील काळे, नारायन आरु यांच्यासह तालुक्यातील राजकीय व व्यापारी बांधवानी हजेरी लावली होती. यावेळी युनियनच्यावतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आसरामाता संघटनेचे अध्यक्ष सुभाष जोंगदड, उपाध्यक्ष सैयद शकील, जलील उत्सव समीतीचे अध्यक्ष गजानन काळदाते, हरी काष्टे, रामदास तायडे, रामेश्वर मुरुकूटे, ज्ञानेश्वर तायडे, सैयद मंजूर, नरेंद्र कांबळे आर्दीचा सहभाग होता.

### ४ क्विंटलच्या भाकरी

आसरामाता संस्थान येथे कार्तिक पौर्णिमानिमित्त भाविकांची मांदियाळी होती. या महोत्सवात प्रसादाचे विशेष महत्त्व असते. कार्तिक पौर्णिमाच्या मुहूर्तावर मंदिर परिसरात तब्बल ४ क्विंटल गव्हाच्या भाकरी व ५५ किलो मिश्र डाळ व ६० किलो रवा पासून बनवलेल्या शिरा अशा महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

# वंदे मातरम १५०वा वर्धापन दिनानिमित्त कृषि महाविद्यालय रिसोड द्वारे विविध उपक्रम




रिसोड : रासेयो एकक कृषी महाविद्यालय रिसोड अंतर्गत कृषी महाविद्यालय रिसोड येथील समन्वयक आर. एस. डवरे व प्राचार्य डॉ. ए. एम. अप्तूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'वंदे मातरम' या राष्ट्रप्रेम जागवणाऱ्या गीताच्या १५०व्या वर्धापन दिनानिमित्त निबंध स्पर्धा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रभक्ती वर रील्स, लोगो आणि कविता असे विविध उपक्रम राबविण्यात आले. दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सामूहिक गीतगायनाचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी जवळपास १०० विद्यार्थी व १५ प्राध्यापक व कृषी महाविद्यालय रिसोड येथील इतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन उपस्थिती दर्शविली. सर्वांनी सामूहिक 'वंदे मातरम' हे गीत गायन करत भारतमातेप्रती आपले प्रेम, अभिमान आणि निष्ठा व्यक्त केली. सदरील कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना दृढ करणे आणि मातृभूमीबद्दल आदर, अभिमान जागवणे हे होते. या निमित्ताने विद्यार्थ्यांना या गीताचा इतिहास, त्यामागील राष्ट्रभक्तीपूर्ण विचार आणि स्वातंत्र्य चळवळीत याचे योगदान याची माहिती देण्यात आली. उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. सदरील कार्यक्रम डॉ. पि. जी. देव्हडे उपप्राचार्य, प्रा. डी. डी. मसुरकर रासेयो कार्यक्रम अधिकारी व प्रा. एल. बि. काळे सह कार्यक्रम अधिकारी तथा शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख यांच्या पुढाकारातून पार पडला (वि. प्र).

# अभय योजनेत थकबाकीदारांना दंडाच्या रकमेत ७५ टक्के सूट



पुणे: पुणे महापालिका हद्दीतील मिळकराची थकबाकी असलेल्या सुमारे पाच लाख मिळकतधारकांसाठी दंडाच्या रकमेत ७५ टक्के सूट देणारी अभय योजना १५ नोव्हेंबर ते १५ जानेवारी या दरम्यान राबविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. महापालिकेने राबविलेल्या यापूर्वीच्या चार अभय योजनांमध्ये लाभ घेतलेल्या एक लाख ४० हजार थकबाकीदारांना या योजनेचा लाभ घेता येणार नसल्याचे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी स्पष्ट केले. रस्त्यांच्या भूसंपादनासह मोठ्या प्रकल्पांसाठी निधीची आवश्यकता असल्याने या अभय योजनेचा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे महापालिका प्रशासनाने यापूर्वी २०१५-१६ पासून २०२१-२२पर्यंत वेगवेगळ्या चार अभय योजना राबविल्या होत्या. त्या अभय योजनांचा एक लाख ४० हजार थकबाकीदारांनी लाभ घेतला होता. या लाभधारकांकडे त्यानंतरही ४७७ कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे अभय योजनेचा लाभ घेतल्यानंतरही प्रामाणिकपणे मिळकतकर भरण्याकडे त्यांचा कल नसल्याने त्यांना येत्या अभय योजनेतून वगळण्यात आले आहे. त्याव्यतिरिक्त सुमारे पाच लाख मिळकतधारकांकडे १२ हजार १६१ कोटी रुपयांची थकबाकी आहे. सध्याच्या थकबाकीदारांकडे थकीत असलेल्या मिळकतकराच्या रकमेवर नऊ हजार दोन कोटी रुपयांचा दंड प्रलंबित आहे, तर त्यांची मिळकतकराची दंडाशिवाय प्रलंबित असलेली रक्कम तीन हजार १५८ कोटी रुपये आहे.

# सुधारित अनुदान योजनेसाठी १४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई,दि.३ : अल्पसंख्याक विकास विभागामार्फत अल्पसंख्याक बहुल शासनमान्य प्राप्त खासगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सुधारीत अनुदान योजना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अनुदान मिळवू इच्छिणाऱ्या अटी व शर्तींची पूर्तता करून विहित नमुन्यातील अर्जासह संपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारि, मुंबई शहर (जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ह ४००००१) येथे १४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे. अर्जाचा नमुना https://mdd.maharashtra.gov.in यावर उपलब्ध आहे. निर्धारित दिनांकानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक १४ नोव्हेंबर असून, जिल्हाधिकारी कार्यालयाने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून, त्रुटींची पूर्तता करून, अंतिम पात्र प्रस्ताव शासनास सादर करण्याचा अंतिम दिनांक ह १५ डिसेंबर, २०२५ पर्यंत आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे अथवा दूरध्वनी: ०२२-२२६६०१६७, ई-मेल: dpomumbaicity@gmail.com यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# संत तुकाराम महाराज विद्यालयात 'विद्यार्थी दिन' साजरा




रिसोडः महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आज ७ नोव्हेंबर हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शालेय जीवनातील 'पहिला दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा करण्यात आला. शाळेचे प्राचार्य साहेबराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन सानप यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचाराची रुजवन संपूर्ण विद्यार्थ्यांमध्ये व्हावी हा संदेश दिला.

या कार्यक्रमामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यांनी हिरीरीने सहभाग नोंदविला . भाषणे,निबंध स्पर्धा या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि देशाला विद्यार्थ्यांच्या माध्यमाने आदर्श नागरिक घडविण्याच्या उद्देशाने शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. यांनी ७ नोव्हेंबर हा दिवस 'विद्यार्थी दिन 'म्हणून का साजरा केला जातो या मागचा उद्देश व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य व शिक्षणाची ताकद काय असते शिक्षणाने माणूस सुसंस्कृत, वैचारिक क्रांती करणारा बनू शकतो . ७ नोव्हेंबर या दिवशी सर्वप्रथम डॉ . भीमराव आंबेडकर यांना शाळेत प्रवेश मिळाला आणि तेथूनच त्यांच्या क्रांतिकारी शैक्षणिक विचाराला सुरुवात झाली. आणि देशाला एक महान सामाजिक ,राजकीय क्रांतिकारी विचार देणारा महामानव भेटला. असे विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे यावेळी स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला सर्व शालेय शिक्षक व शिक्षकेतर बांधव उपस्थित होते. श. प्र.

# दापुरी खुर्द परिसरात चोरांचा धुमाकूळ

## शेतकऱ्यांच्या शेतातील स्प्रिंकलरच्या तोट्याची चोरी



**रिसोड** - वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील परंतु शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या दापोली खुर्द गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील स्प्रिंकलर पाईपला जोडलेल्या रब्बी हंगामाचे पोलीस चालू असताना जवळपास २३ शेतकऱ्यांच्या शेतातील स्प्रिंकलरच्या तोट्या चोराने चोरून नेल्या.

त्यामुळे या अगोदरच शेतकरी आस्मानी व सुलतानी संकटाचा सामना करत असतांना त्यातच यावर्षी अतिवृष्टी झाल्याने शासनाने घोषित केलेली अद्याप पर्यंत मदतही शेतकऱ्यांच्या खात्यात पोहोचली नाही. अगोदरच अडचणीत असलेल्या शेतकऱ्याने येणाऱ्या रब्बी हंगामातील पिकांना सावरण्यासाठी सामोरे कसे जायचे हा यक्ष प्रश्न निर्माण झाल्याने शेतकरी पुरता मेटाकुटीला आहे. मालेगाव तालुक्यातील शिरपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनी याबाबत तात्काळ तपासाची चक्रे फिरवून शेतकऱ्यांना स्प्रिंकलर तोट्या मिळवून द्याव्यात. तरच शेतकरी तग धरू शकेल! शिरपूर पोलीस स्टेशनचा चोरावरील वचक कायम नसल्याचे यावरून दिसते. दापुरी येथील शेतकऱ्यांनी याबाबतचा रिपोर्ट पोलीस स्टेशन दिला असल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले. व त्याचा पंचनामाही करण्यात आला. आता शेतकऱ्याची पुढील तपासाकडे लक्ष आहे.

### दिव्यांग कल्याण विभागाचा 'एआय आधारित' व्हाट्सअॅप चॅटबॉट

मुंबई, दि. ७ : दिव्यांग कल्याण विभागात दिव्यांग व्यक्तींसाठी एआय-आधारित व्हाट्सअॅप चॅटबॉट ७८२१९२२७७५ क्रमांक कार्यान्वित आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी असणाऱ्या योजनांसह तक्रार निवारण व्यवस्था 'एका क्लिकवर' उपलब्ध करून देणे, हा या सेवेचा मुख्य उद्देश आहे. दिव्यांग व्यक्तींना योजनांची माहिती मिळवताना किंवा तक्रारी दाखल करताना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

## भा.मा.शाळेत विद्यार्थी दिन साजरा



रिसोड : महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार ७ नोव्हेंबर हा दिवस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शालेय जीवनातील 'पहिला दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा करण्यात यावा म्हणून मिळालेल्या सूचनेनुसार भारत माध्यमिक शाळा चिंचबा भर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एम डी शिंदे हे होते तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर बांधव विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी एस सानप यांनी करून या कार्यक्रमा मागचा शासनाचा उद्देश स्पष्ट करीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचाराची रुजवन संपूर्ण विद्यार्थ्यांमध्ये व्हावी हा संदेश दिला. या कार्यक्रमामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यांनी हिरीरीने सहभाग नोंदविला . भाषणे,निबंध स्पर्धा या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि देशाला विद्यार्थ्यांच्या माध्यमाने आदर्श नागरिक देण्याच्या उद्देशाने शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांमधून आणि गीतांमधून बाबासाहेब यांचे शैक्षणिक विचार किती महान आहेत याबाबत विचार व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणा मधून मुख्याध्यापक एम डी शिंदे यांनी ७ नोव्हेंबर हा दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून का साजरा केला जातो या मागचा उद्देश व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य व शिक्षणाची ताकद काय असते शिक्षणाने माणूस सुसंस्कृत, वैचारिक क्रांती करणारा बनू शकतो . ७ नोव्हेंबर १९०० या दिवशी सर्वप्रथम भीमराव आंबेडकर यांना शाळेत प्रवेश मिळाला आणि तेथूनच त्यांच्या क्रांतिकारी शैक्षणिक विचाराला सुरुवात झाली आणि देशाला एक महान सामाजिक राजकीय क्रांतिकारी विचार देणारा महामानव भेटला. असे विचार विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप सानप यांनी केले.श.प्र.

## रिसोड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाचा दिलासा

### तब्बल ३२ करोड रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांची माहिती



**रिसोडः** रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांना सरकारने अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची तात्काळ आर्थिक मदत दिली आहे. जुलै ते ऑगस्ट २०२५ दरम्यान रिसोड तालुक्यातील ग्रामीण भागात मुसळधार पावसामुळे नद्या व नाले तुडुंब भरून वाहू लागले आणि त्या नदी नाल्यांना पूर येऊन त्याचे पाणी शेतात शिरल्याने हजारो शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पीक नष्ट झाले, त्याचबरोबर माती वाहून गेली आणि काही शेतांमध्ये फक्त दगड शिल्लक राहिल्याने शेतकऱ्यावर मोठ्या प्रमाणात आर्थिक संकट कोसळले होते व शेतकरी त्रस्त झाला होता त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकरी करीत होते. तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी सांगितले की, प्रशासनाने नुकसानीचे मूल्यांकन पूर्ण केले असून, अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांसाठी एकूण ?३७७.३८५ दशलक्ष अनुदान मंजूर केले आहे. यातून ५५,६०७ शेतकऱ्यांपैकी ४३,७६९ शेतकऱ्यांच्या खात्यात ?३२१.७३ दशलक्ष थेट जमा केली गेली आहे. उर्वरित ११,८३८ शेतकऱ्यांसाठी अनुदान मंजूर झाले असले तरी, बँक खात्याशी संबंधित अपूर्ण माहिती, संमती पत्र किंवा अन्य कागदपत्रांची कमतरता असल्याने त्यांच्या खात्यात रक्कम अद्याप जमा झालेली नाही. तहसीलदार तेजनकर यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, आपले बँक खाते क्रमांक, बँक पासबुक माहिती तसेच शेअर्ड खाते असल्यास सह-खातेदारांची स्वाक्षरी असलेले संमतीपत्र ग्रामपंचायत, ग्राम महसूल अधिकारी किंवा कृषी सहाय्यक यांना त्वरित सादर करावे, जेणेकरून अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात लवकरात लवकर जमा करता येईल.

तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी स्पष्ट केले की, सरकार आणि प्रशासन शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी पूर्णपणे संवेदनशील आणि वचनबद्ध आहे. अतिवृष्टीमुळे बाधित प्रत्येक पात्र शेतकऱ्याला न्याय आणि वेळेवर अनुदान मिळावे यासाठी प्रशासन सतत प्रयत्नशील आहे. रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे पूर्ण करून सरकारी अनुदानाचा लाभ घेणे आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून दिलासा मिळणार आहे.श.प्र

## स्व. पाटील महाविद्यालयात इंदिरा गांधी पुण्यतिथी व सरदार पटेल यांची जयंती साजरी

रिसोडः स्थानिक स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम .एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती तसेच राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी या प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रियदर्शनी इंदिरा गांधी ह्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रमुख नेत्या व भारताच्या पहिल्या आणि आजपर्यंतच्या एकमेव महिला पंतप्रधान आहेत.

तसेच आजच्या दिवशी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता म्हणून साजरी केली जाते. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एकतेसाठी मोठे योगदान दिल्याचे मत व्यक्त केले. यानंतर राष्ट्रीय एकता दिनानिमित्त एकतेची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ. प्रकाश हनवते यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. तुळशीराम भोईर यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होत(वि. प्र).





✦ वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालयासह मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलही थाटणार, मुख्यमंत्र्यांच्याहस्ते होणार भूमीपूजन

## गडचिरोलीत १४६८ कोटींचा प्रकल्प

**सिरोंचाः** सिरोंचा तालुक्यातील सिरोंचा- अंकिसा या राष्ट्रीय महामार्गावरील राजेश्वरपल्ली या भागात २६४ एकर परिसरात राणा शिपिंग कंपनीचा १ हजार ४६८ कोटी रुपयांचा प्रकल्प होणार असून उद्या ८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भव्य रुग्णालय व शैक्षणिक संकुलाचा भूमिपूजन सोहळा पार पडणार आहे.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते तीनशे खाटाच्या अत्याधुनिक सोयीने सुसज्ज असलेल्या रुग्णालयासह वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय अशा भव्य शैक्षणिक संकुलाच्या प्रकल्पाचे भूमिपूजन पार पडणार असल्याने तीन राज्याच्या सीमावर्ती भागात असलेला सिरोंचा तालुका विकासाच्या कक्षेत येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राणा शिपिंग कंपनीचे संचालक राणा यांच्या पुढाकारातून होणारा हा प्रकल्प १४६८ कोटी रुपयांचा असून २६४ एकर मध्ये सिरोंचा - अंकीसा या राष्ट्रीय महामार्गावर राजेश्वरपल्ली या भागात साकारत आहे. त्यामुळे तिन्ही राज्याच्या सीमवर्ती भागातल्या आदिवासी जनतेला या भागात या प्रकल्पामुळे मोठा फायदा होणार असल्याचे बोलल्या जात आहे. याठिकाणी उभारण्यात येणाऱ्या शैक्षणिक संकुलात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ७५ टक्के जागा राखीव ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या शैक्षणिक संकुलात वसतीगृहाची व्यवस्था सुद्धा राहणार आहे.

स्पर्धा परीक्षेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतीगृह मार्गदर्शन तसेच सुसज्ज लायब्ररीची व्यवस्था सुद्धा या ठिकाणी होणार आहे. या भागात कुठलीही आरोग्याची चांगली सोय नसल्याने नागरिकांना तब्बल ४०० किलोमीटर अंतरावर असलेल्या नागपूर ,अडीचशे किलोमीटर अंतरावर असलेल्या हैदराबादला जावे लागते. साध्या बाळंतपणाच्या शस्त्रक्रियेसाठीही लगतच्या तेलंगाणा किंवा चंद्रपूर, गडचिरोलीला जावे लागण्याची परिस्थिती अनेकदा या भागातल्या लोकांवर ओढवली आहे. मोठा अपघात झाल्यानंतर वेळेवर उपचार न मिळाल्याने अनेकांचे जीव गेले आहेत.अशा भागात पुण्यातल्या 'रुबी' सारख्या अत्याधुनिक सोयीने सुसज्ज असलेल्या रुग्णालयाच्या समकक्ष असलेल्या ३०० खाटांचे भव्य रुग्णालय उभारण्यात येणार आहे.

## नगरपरिषद निवडणूक संदर्भात स्थिर सर्वेक्षण पथक तैनात



**रिसोड** - तालुक्यात होऊ घातलेल्या रिसोड नगरपरिषद च्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अंतर्गत रिसोड नगर परिषदेने निवडणूक अधिकारी तहसीलदार तथा मुख्याधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने रिसोड मध्ये होऊ घातलेल्या नगर परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने स्थिर सर्वेक्षण पथक तैनात करण्यात आले .

प्रत्येक मुख्य रस्त्यावर यामध्ये वाशिम नाका हिंगोली नाका मालेगाव नाका आणि मेहकर नाका या चारही रस्त्यावर स्थिर सर्वेक्षण पथक परिणाम करण्यात आले असून प्रत्येक गाडीची तपासणी या स्थिर सर्वेक्षण पथकाच्या माध्यमातून करण्यात येते व हे कर्मचारी प्रत्येक वाहनाची चौकशी करताना त्यामध्ये काय आहे काय नाही गाडी कोठे कोठून आली कोठे जाते त्या गाडीचा नंबर कोणता संबंधित गाडीवाल्याचा मोबाईल नंबर इत्यादी माहिती त्याच्याकडून घेतली जाते व आपल्या दप्तरी नोंद केली जाते. अशाच पद्धतीने सर्व नाक्यावर ही सर्वेक्षण पथकाची कार्यवाही चालू असते रिसोड येथील वाशिम नाक्यावर स्थिर सर्वेक्षण पथकामध्ये शेषराव प्रल्हाद नवले, संतोष एम खुळे, रवी अंभोरे फोटोग्राफर, मनोहर वानखडे पोलीस हेडकॉन्स्टेबल हे कर्मचारी येणार होते. त्यामुळे रिसोड नगर परिषदेच्या निवडणूक संदर्भात निवडणुक विभागाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला.

## राज्यात थंडी वाढणार!

### तापमानात २ ते ५ अंशांची घट होण्याची शक्यताः हवामान विभागाचा अंदाज

**मुंबईः** उत्तर भारतातील भागात तापमानात तब्बल ५ अंशांची घट झाली आहे. उत्तरेकडून थंड वाऱ्यांचा प्रवाह सुरू असून हे वारे आता मध्य आणि पश्चिम भारताकडे सरकत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील हवामानातही मोठे बदल दिसून येत आहेत. काही ठिकाणी दिवसा दमट आणि ढगाळ हवामान तर रात्रीच्या वेळी गारवा आणि थंडी जाणवते आहे. पुढील सहा



दिवसांत राज्यातील तापमानात आणखी २ ते ५ अंशांची घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

हवामान तज्ज्ञ डॉ. सुप्रित कुमार यांच्या माहितीनुसार, केरळच्या आसपास सायक्लोनिक सर्क्युलेशन तयार झाले असून उत्तरेकडील भागातदेखील आणखी एक सायक्लोनिक सिस्टीम सक्रिय झाली आहे.

● नागपूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर आणि गडचिरोलीसह संपूर्ण विदर्भात कोरडे वातावरण राहील; नागपूरमध्ये कमाल तापमान ३० अंशांच्या आसपास आणि किमान तापमान १६ अंश सेल्सिअस इतके राहण्याचा अंदाज वर्तवला गेला आहे.